Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- संकिर्ण-२४०८ / प्र.क्र.४१ / विशि-१, दिनांक ५ सप्टेंबर, २०२४.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्गमीत केलेल्या दि.१७/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विद्यापीठासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला क्र. एसयुके-२०११ / (७१/११) / विशि-१, दि.२४ फेब्रुवारी, २०११ चा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आला आहे. दि.१७/१२/२०१८ रोजीचा शासन निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असून, मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे अशा पदांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही.

तथापि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ५ सप्टेंबर, २०२४, रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे. सोबत पत्र जोडले आहे.

"दिनांक १७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे. सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे. तसेच त्याआधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा", असे प्रमाणपत्र इच्छूक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकरित्या घेणेबाबत सूचित केले आहे.

सबब, जे कर्मचारी वर नमूद केल्याप्रमाणे अतिप्रदान रक्कमेची परतफेड करून ७ वा वेतन आयोग लागू करून घेण्यास इच्छूक आहेत अशा कर्मचाऱ्यांनी सोबत जोडलेले संमतीपत्र दि.१०/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत आस्थापना-२ विभागात सादर करावे, जेणेकरून शासनपत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

डॉ.व्ही.एन.शिंदे
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना /** 767

**दिनांक :-** 27 SEP 2024

**प्रति,**

१. स्वीय सहाय्यक - मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
२. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप :- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. vishi1-hted@mah.gov.in, दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:-संकिर्ण-२४०८/प्र.क्र.४१/विशि-१ दिनांक:- ५ सप्टेंबर,२०२४

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.

२) कुल सचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ-पुणे.

३) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर.

४) कुल सचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

५) कुल सचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

६) कुल सचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

७) कुल सचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथील उर्वरीत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोग लागू करण्याची विनंती.

विषयांकित प्रकरणी मा.श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू बा.कडू, विधानसभा सदस्य यांच्याकडून दिनांक २५ जून,२०२४ चे पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सहा विद्यापीठातील पदनामे आणि वेतनश्रेणी, विहित कार्यपध्दतीची अवलंब न करता दिनांक २२ नोव्हेंबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये बदलण्यात आली होती. यास्तव, सदर आदेश दिनांक १७ डिसेंबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले असून पदनामे आणि वेतनश्रेणी पूर्ववत करण्यात आली आहेत. त्यासंबंधित प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रविष्ट असून मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे अशा पदांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही. तथापि, मा.विधानसभा सदस्य आणि संबंधित कर्मचारी यांची विनंती विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

(१) "दिनांक १७ डिसेंबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे, सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे, तसेच त्याआधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा," असे प्रमाणपत्र, विद्यापीठाच्या कुलसचिवांनी इच्छुक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिरित्या प्राप्त करुन घ्यावे.

(२) विद्यापीठाच्या कुलसचिवांनी कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे आणि माहिती संकलित करून संचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावी.

(३) संचालक, उच्च शिक्षण यांनी अशा पदांची, पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी आधारभूत मानून समकक्ष सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी नमूद करावी, त्यानुसार ७ व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी प्रस्तावित करावी.

(४) संचालक, उच्च शिक्षण यांनी संकलित माहिती आणि ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(सं. रा. उलेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- १) मा.श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू बा.कडू, विधानसभा सदस्य, ६६ सी, मनोरा आमदार निवास, नरीमन पॉईंट, मुंबई यांना माहितीस्तव.

२)निवडनस्ती.

# संमतीपत्र

मी श्री / श्रीमती ----------------------------------------------------------------------------------------

विद्यापीठामध्ये ------------------------------------------- या पदावर कार्यरत आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्गमीत केलेला दि.१७/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विद्यापीठासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला क्र. एसयुके-२०११ / (७१/११) / विशि-१, दि.२४ फेब्रुवारी, २०११ चा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आला आहे. दि.१७/१२/२०१८ रोजीचा शासन निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असून, मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे अशा पदांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही.

तथापि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ५ सप्टेंबर, २०२४, रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

“दिनांक १७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे. सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे. तसेच त्याआधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा”, असे प्रमाणपत्र इच्छूक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकरित्या घेणेबाबत सूचित केले आहे.

**सबब, वर नमूद केल्याप्रमाणे अतिप्रदान रक्कमेची परतफेड करून ७ वा वेतन आयोग लागू करून घेण्यास मी इच्छूक आहे.**

सदरहू संमतीपत्र हे मी स्वेच्छेने लिहून देत आहे. तसेच याबाबत भविष्यात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे शासन आदेश व निर्देशाच्या अधीन राहून सदरचे संमतीपत्र मी देत आहे.

**ठिकाण :- कोल्हापूर.** **स्वाक्षरी**

**दिनांक :-** **(नाव श्री/श्रीमती ---------------------------------------------------)**